# शेरशहा

## (इ.स. १५४० ते १५४५)

मध्युगीन भारताच्या इतिहासात बाबराने स्थापन केलेली मोगली सत्ता हुमायूनाच्या काळात खंडीत करण्याचे आणि दिल्लीच्या गादीवर सूरवंशाची सत्ता प्रस्थापित करण्याचे महान कार्य शेरशहा सूर याने केले. शेरशहाने केवळ पाच वर्षे राज्य चालविले. त्यानंतर अवघ्या दहा वर्षात सूर वंशातील शेवटचा राजा शिकंदर सूर याचा पराभव करुन हुमायूनाने पुन्हा मोगली सत्तेची घडी बसविली. अत्यंत अल्प काळात मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील श्रेष्ठ राज्यकर्त्यांच्या मालिकेत शेरशहाचे नाव घेतले जाते. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात महसूल व अन्य क्षेत्रात शेरशहाने अमलात आणलेल्या सुधारणा उच्चप्रतीच्या नि जनकल्याणकारी समजल्या जातात. त्याच्या सुधारणामुळेच शेरशहा हा सम्राट अकबराला अग्रगामी असलेला शासक समजतात.

शेरशहाचे मूळ नाव फरीद होते. लोदीच्या काळात त्याचे आजोबा इब्राहिमसूर आणि वडील मियाहसन अफगाणिस्थानातून भारतात आले. हिंदुस्थानात पंजाबमध्ये बझवाडा या ठिकाणी स्थायिक झाले होते. तेथेच फरीदचा जन्म झाला. शिकंदर लोदीच्या काळात मियाहसनला बिहार मधील ससाराम, खवासपूर, हाजीपूर हे परगणे दिले. फरीदने आपले बालपण संसाराममध्येच घालवले. बापाबरोबर त्याने सुमारे एकवीस वर्ष राहून युध्द मोहिमा व राज्यकारभाराचे ज्ञान प्राप्त केले. फरीदचे वडील इ. स. स १५१८ मध्ये मरण पावले. त्यानंतर फरीद बिहारचा सुभेदार बहारखान याच्याकडे गेला व त्याच्या पदरी सेवा रुजू केली. फरीदच्या पराक्रमावर व एकनिष्ठतेवर खूष होऊन बहारखानाने त्यास "शेरखान" ही पदवी प्रदान केली. तेथून काही कारणामुळे शेरखान बाबरला जाऊन मिळाला. शेरखान एकंदर दीड वर्षे बाबराजवळ होता. ह्या काळात मोगलांच्या राज्यकारभासचे आणि युध्दनीतीचे बारकाईने निरीक्षण केले. त्याचवेळेस भारतात पुन्हा पठाणांचे राज्य स्थापन करण्याची महत्वाकांक्षा त्याचा मनात जागृत झाली होती म्हणून पुन्हा बिहारमध्ये येऊन त्याने आपले सामर्थ्य संघटित करण्यावर भर दिला. त्यावेळेस बिहारची सत्ता बहारखानाचा मुलगा जलालखानाकडे होती. परंतु जलालखान अल्पवयीन असल्यामुळे सर्व सत्ता शेरखानाकडेच होती. बंगालमधील नुसरतशहाविरुध्द शेरशहाने चांगला पराक्रम दाखविला होता. त्यामुळे शेरखानाच्या सामर्थ्याची चुणूक सर्वाच्या लक्षात आली. जलालखानानंतर दक्षिण बिहारमध्ये शेरखानाने आपले सामर्थ्य बलाढ्य पठाण या नात्याने संघटित केले.

Scanned by CamScanner

**हुमायूनशी संघर्ष व सत्ताप्राप्ती** - हुमायून व शेरखानचा पहिला संघर्ष इ. स. १५३२ मध्ये चुनारगडाच्या स्वारीत झाला होता. हुमायूनने या स्वारीत शेरखानचा संपूर्ण पराभव न करता त्याच्याशी तह केला होता. चुनारगड शेरखानच्या ताब्यात ठेवून तो आग्र्यात निघून गेला होता. त्यानंतर शेरखानाने आपले सामर्थ्य वाढवून बिहार बंगालमध्ये प्रबळ सत्ता निर्माण केली होती. जेव्हा हुमायूनने त्याच्यावर पुन्हा स्वारी केली तेव्हा शेरखानने त्याचा चौसा येथे झालेल्या लढाईत पराभव करून त्याला आग्र्याला परतवून लावले. त्यानंतर त्याने "शेरशहा" ही बिरुदावली धारण केली. त्यानंतर बिलग्रामच्या लढाईत इ. स. १५४० मध्ये शेरखानने हुमायूनचा पराभव घडवून आणला व त्याचे राज्य जिंकून घेतले त्यानंतर लगेच शेरशहाने दिल्ली - आग्रा जिंकून घेऊन इ. स. १५२६ मध्ये संपुष्टात आलेली पठाणांची सत्ता पुन्हा इ. स. १५४० मध्ये प्रस्थापित केली. हुमायूनला पंजाबमध्ये पळून जावे लागले.

**शेरशहाची विजयी घोडदौड** - शेरशहाने दिल्ली व आग्रा जिंकून घेतल्यानंतर सिंध आणि झेलमच्या खोऱ्यात असलेल्या लढाऊ, गखूबर टोळ्यांचा संपूर्ण प्रदेश उध्वस्त केला परंतु त्यांचा संपूर्ण नायनाट करणे जमले नाही. याच वेळेस बंगालमध्येही बंड पेटल्याची वार्ता कळल्यामुळे त्यास बंगालकडे जावे लागले. इ. स. १५४१ मध्ये शेरशहाने बंगालमधील बंडखोर सुभेदारांच्या कारवाया हाणून पाडल्या. बंगालची व्यवस्था लावून शेरशहाने मालव्यावर स्वारी करून ग्वाल्हेर उज्जयिनी, सारंगपूर, मांडू ही महत्त्वाची ठिकाणे जिंकून घेतली. रणथंभोरचा किल्ला जिंकून तेथे त्याने आपला मुलगा आदिलशहाची नेमणूक केली. इ. स. १५४३ मध्ये शेरशहाने रायसेनवर स्वारी केली. त्यात रायसेनचा राजा पुरणमल याची कत्तल करण्यात आली. रायसेननंतर शेरशहाने मुलतान, सिंध व राजस्थानच्या प्रदेशावर मोहिमा आखल्या आणि तेथे आपले वर्चस्व प्रस्थापित केले. राजस्थान जिंकल्यावर शेरशहाने इ. स. १५४५ मध्ये बुंदेलखंडातील कलिंजरला किल्ल्यावर स्वारी केली. तेथे किर्तीसिंह नावाचा राजा राज्य करीत होता. शेरशहाने तोफेचा मारा सुरु केला. शेवटी पठाणांनी प्रयत्नांची शिकस्त करून किल्ला जिंकून घेतला. परंतु दारुगोळ्याच्या साठ्याने स्फोट घेतल्यामुळे शेरशहा त्यात भयंकर भाजून निघाला व त्यातच तो २२ मे १५४५ मध्ये मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा जलालखान हा "इस्लामशहा" म्हणून दिल्लीच्या गादीवर आला.

**शेरशहाची योग्यता :-**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक असामान्य शासक, प्रशासक, सेनापती म्हणून शेरशहाचा गौरवाने उल्लेख करतात. अत्यंत अल्पकाळात मध्ययुगीन भारतात त्याने एक आदर्श राज्य स्थापन केले. त्याच्या महसूल विषयक व अन्य सुधारणा सम्राट अकबराने देखील कमी अधिक प्रमाणात दुरुस्त्या करुन उपयोगात आणल्या आहेत. म्हणून शेरशाहाला अकबराचा अग्रगामी शासक म्हणून संबोधतात. शेरशहाच्या बहुविध व्यक्तीमत्वाचे पैलू खालील प्रमाणे पाहता येतील.

**१. बहुगुणी व्यक्तीमत्व** - शेरशहा हा मध्ययगीन भारताच्या इतिहासातील बहुगाणी सुलतान होता. सर्व प्रकारची प्रतिकूलता असताना देखील त्याने गुणवत्ता व कर्तुत्वाच्या बळावर आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. अरबी, फारसी भाषेवर त्याचे चांगले प्रभुत्व होते.

**२. थोर योध्दा व कुशल सेनापती** - शूर सैनिकाला आवश्यक असणारे गुण त्याच्या व्यक्तीमत्वात होते. युध्दातील जलद हालचाली, डावपेच, मुत्सद्दीपणा इत्यादीमध्ये तो निष्णात होता. सैन्याचे कोणत्याही बिकट प्रसंगी कुशलतेने संघटन करण्याची अप्रतिम कला त्याच्याजवळ होती. म्हणूनच एक थोर योध्दा व कुशल सेनापती म्हणून इतिहासावर टाकलेली छाप प्रभावी वाटते.

Scanned by CamScanner

३. **नामांकित प्रशासक** - शेरशहा हा केवळ विजेताच नव्हता तर तो एक नामांकित प्रशासकही होता. त्याने स्थापन केलेले साम्राज्य लवकर नष्ट झाले असले तरी त्याने स्थापन केलेली प्रशासन व्यवस्था सम्राट अकबराने स्विकारल्याचे दिसून येते. आणि पुढे तीच प्रशासन संस्था संपूर्ण मोगल काळासाठी कमी अधिक प्रमाणात कायम राहिल्याचे पहावयास मिळते. शेरशहाची प्रशासन व्यवस्था ही आधुनिक शासन व्यवस्थेची आधारशीला मानली जाते.

४. **जनकल्याणकारी शासक :-** मध्ययुगीन भारताच्या इतिहासात प्रजेच्या कल्याणाला अधिक महत्व देणारा तो पहिला शासक समजला जातो. शांतता व सुव्यवस्थेच्या पायावर त्याने स्थिर साम्राज्य निर्माण केले. अर्स्कीनच्या मताप्रमाणे - "अकबरापूर्वी जनतेचा सुखकर्ता, दुःखहर्ता शेरशहा सारखा दुसरा कुणीही राजा झाला नाही." महसूल, न्याय आदी सर्व क्षेत्रात त्याने जनकल्याणाला महत्वपूर्ण स्थान दिले होते. अकबराने जे लोककल्याणकारी शासन पुढे स्थापन केले. त्याचा पायाच जणू शेरशहाने घातला होता.

५. **न्यायप्रियता :-** न्यायप्रियता हे शेरशहाचे वैशिष्ट्य होते. न्यायदानाच्या कामकाजात त्याला स्वतःला रुची होती. दर बुधवारी न्यायदानाच्या प्रक्रियेत तो सहभागी होत असे. कोणत्याही निरपराध व्यक्तीला शिक्षा होता कामा नये, अशी त्याची दृढभावना होती. तसेच अपराधी व्यक्तीला त्याच्या गुन्ह्याप्रमाणे योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे. ह्या बद्दल त्याचा कटाक्ष होता. केंद्रीय पातळीपासून ते ग्राम पातळी पर्यंतची एक परिपूर्ण न्यायव्यवस्था शेरशहाने निर्माण केलेली होती. म्हणूनच मध्ययुगीन काळात एक न्यायप्रिय राजा म्हणून त्याचा गौरवाने उल्लेख केला जातो.

६. **धार्मिक सहिष्णुता :-** शेरशहा जरी सुन्नी पंथाचा कट्टर अनुयायी असला तरी त्याची धार्मिक वृत्ती धर्मांध स्वरुपाची नव्हती. रायसेन, कालिंजर व जोधपूरच्या राजा विरुध्द लढताना त्याने कांही प्रमाणात हिंदु विराधी कृत्ये केली. परंतु ही युध्दे जिंकण्यासाठी त्याने स्विकारलेली निती होती. त्याच्या सैन्यात व प्रशासनात बऱ्यात मोठ्या प्रमाणात हिंदूचा समावेश होता. आपल्या चलनावर त्याने आपल्या नावापुढे 'श्री' असा उल्लेख केला होता. तसेच नाण्यावर देवनागरी लिपीचा वापर केला होता. ब्रम्हजित गौड, विक्रमजीत व राजा तोडरमल हे प्रमुख हिंदू सहकारी त्याच्या प्रशासनात होते. डॉ. कानुनगो म्हणतात - "हिंदु धर्मविषयी त्याची वागणूक आदरयुक्त असून हिंदूंना उपासना स्वातंत्र्य होते."

७. **धाडसीवृत्ती :-** शेरशहाने आपल्या जीवनात मिळविलेले यश त्याच्या चिकाटी व धाडसी वृत्तीचे प्रतिक मानले जाते. एका सामान्य नौकरापासून ते सम्राट पदापर्यंत त्याने संपादन केलेले घवघवीत यश हे त्याच्या साहसीवृत्तीचे, धडपडीचे आणि परिश्रमशीलतेचे फलित होय.

८. **अफगाण सत्तेचा संस्थापक :-** हुमायून व इतर शत्रूचा पराभव करून भारतात अफगाणांच्या सत्तेचे पुनरुज्जीवन करणारा शेरशहा हा एक थोर नेता होता. त्याच्या प्रयत्नामुळेच सर्व अफगाण संघटीत झाले. शेरशहाच्या नेतृत्वाखाली अफगाणांच्या सत्तेचे पुन्हा पर्व सुरु झाले. अर्थात, शेरशहानंतर अफगाण सत्तेला कर्तबगार शासक मिळाले नाहीत, म्हणून ही सत्ता अल्पायुषी ठरली.

९. **स्थापत्य कलेचा आश्रयदाता :-** आपल्या अल्पशा कारकिर्दीमध्ये शेरशहाने 'ससाराम' या ठिकाणी अत्यंत भव्य, सुंदर आणि आकर्षक अशी कबर बांधली. तसेच झेलम नदीकाठी त्याने रोहतासगड हा प्रसिध्द किल्ला बांधला. दिल्ली जवळ यमुना नदीच्या काठी पुराना किल्ला बांधला. या शिवाय १७०० सराया, १५०० विहिरी आणि अनेक वास्तु शेरशहाने बांधल्या. त्यावरुन त्याचे स्थापत्य कलेविषयीचे प्रेम लक्षात येते. दळणवळणाचे महत्वपूर्ण मार्गही त्याने निर्माण केले.

Scanned by CamScanner

**१०. राष्ट्र निर्माता :-** शेरशहा खरच राष्ट्र निर्माता होता काय ? या संदर्भात इतिहासकारांमध्ये विभिन्न मते दिसतात. परंतु त्याने निर्माण केलेल्या सुधारणामुळे भारतीयात एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्यास मदत झाली. त्याच्या समंजस, सर्वसमावेशक, सहिष्णुतावादी, सुधारक, जनकल्याणकारी धोरणामुळे भारतीयामधील मतभेदाचे स्वरुप बरेच सौम्य व सुसह्य होवून त्यांच्यात एक राष्ट्रीयत्व निर्माण होण्यास योग्य वातावरण निर्माण झाले.

**विविध इतिहासकारांनी शेरशहाच्या कामगिरीचे केलेले मूल्यामापन -**

डॉ. आशिर्वालाल श्रीवास्तव - "शेरशहाची अथक परिश्रमशीलवृत्ती, कर्तव्यनिष्ठा, अनेक सुधारणा, न्यायप्रियता या गुणामुळे त्यास भारताच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळाले आहे."

सर वुल्सले हेग - "तो भारतातील मुस्लीम सत्ताधिशामध्ये सर्वश्रेष्ठ होता. आणि अफगाणातील दोषापासून संपूर्ण अलिप्त असून ते दूर करण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असे."

व्ही.ए. स्मीथ - "शेरशहा स्थापत्यप्रेमी होता. त्याच्या प्रशासकीय सुधारणा काही मर्यादेपर्यंत अल्लाउद्दीन खिलजीच्या सिध्दांतावर आधारीत असून पुढे त्या अकबराने सुधारुन वाढविल्या. शेरशहा जर जास्त जगला असता तर हिंदुस्थानच्या इतिहासात मोगलांचे नाव सुध्दा शिल्लक राहिले नसते."

कालिकारंजन कानुनगो - "शेरशहाच्या पदग्रहणाने उदार इस्लाम युगाची सुरुवात झाली. हे युग औरंगजेबाच्या प्रतिक्रियावादी कारकिर्दीपर्यंत टिकले. भारतात एकराष्ट्रीयता निर्माण करणारा पहिला शासक अकबर हा होय. ह्या अकबराच्या अग्रहक्कात शेरशहाही आपला हिस्सा मागू शकतो."

प्रा. श्री राम शर्मा - "शेरशहाची तुलना जहागीरदाराशी केलेल्या व्यवहाराच्या बाबतीत सातव्या हेन्रीशी, सैन्यसंघटन व अनार्गत प्रशासन या क्षेत्रात प्रशियाचा महान शासक फ्रेडरिक विल्यम प्रथमशी, त्याच प्रमाणे व्यावहारीक दृष्टीकोण आणि राजकीय सिध्दांत या बाबतीत कौटिल्य आणि मॅकिया व्हेलीशी आणि उदारता व प्रजाहितदक्षता या बाबतीत अशोकाशी करणे अयोग्य होणार नाही."

विल्यम अर्स्कीन - "तो आपल्या बुध्दीमतेच्या बळावर सिंहासनारुढ झाला आणि त्याने उच्चपदासाठी स्वतःची पात्रता सिध्द केली."

कीन - "कोणत्याही सरकारने अगदी ब्रिटीश शासनाने देखील पठाण नेता शेरशहा एवढा शहाणपणा दाखवल्याचे दिसून येत नाही."

सर झुल्फिकार अली, कुक्स, डॉ. श्रीराम शर्मा, डॉ. कालिकारंजन कानुनगो या इतिहासकारांनी शेरशहाने व्यापक जनहिताचा राज्यकारभार केल्याबद्दल व हिंदु-मुस्लीमांना समान वागणूक दिल्याबद्दल तो राष्ट्रनिर्माता असल्याचे मत व्यक्त केले आहे. या उलट डॉ. आर.पी. त्रिपाठी व डॉ. आशिर्वादलाल श्रीवास्तव यांनी शेरशहा राष्ट्रनिर्माता मानला जावू शकत नाही. राष्ट्र निर्माता पदास फक्त सम्राट अकबरच लायक ठरु शकतो, असे मांडले आहे.

डॉ. जे. एन. चौधरी - "त्याच्या प्रशासनात नाविन्य नव्हते तर सुधारणा होती. प्रशासकीय विभाग, न्यायदान यंत्रणा, गुप्तहेरपध्दती, व डाकचौकी व्यवस्था शेरशहापूर्वी अस्तित्वात होती.

इतिहासकार क्रुक - "जनतेच्या इच्छेवर आधारलेले भारतीय साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करणारा शेरशहा हा पहिला शासक होय. राजसत्ता प्रजेच्या कल्याणासाठीच असते. न्याय आणि सहिष्णुता तत्वांचा पुरस्कार करुन हिंदूना आपलेसे कसे केले पाहिजे, हे त्याने ओळखले."

Scanned by CamScanner

डॉ. एस. नटराजन - "अकबराचे उदार विचार व विविध क्षेत्रातील सुधारणा पाहता त्याचे भारतीय इतिहासातील स्थान शेरशहापेक्षा श्रेष्ठ आहे. परंतु शेरशहाची प्रशासनातील परिपूर्णता, जागरुकता, तत्परता, कर्तव्यदक्षता व चारित्र्यशुध्दता या गुणांचा विचार केल्यास भारतीय इतिहासात त्याचे स्थान अकबरापेक्षाही श्रेष्ठ आहे."

प्रा. जे. एन. चौधरी - "प्रजेबद्दल प्रेम व सहानुभूती, बळीराजाविषयी कळकळ, उदार दृष्टीकोण, न्यायनिष्ठुरता, प्रशासक व राजकारणातील निपुणता या गुणामुळे मध्ययुगीन भारताच्या इतिहासात शेरशहाचे स्थान श्रेष्ठ असले तरीही त्याचा क्रमांक अकबरानंतरच लागतो."

सारांश, आपल्या अल्पकाळात मध्युगीन भारताच्या इतिहासावर आपल्या गुणवैशिष्ठयामुळे प्रभाव टकाणारा शेरशहा हा आगळा वेगळा शासक होता. एक महान विजेता, अफगाणांचा राज्य संस्थापक, थोर प्रशासक, सुधारक, जनहितदक्ष वृत्तीचा राजा म्हणून शेरशहाने केलेली असामान्य कामगिरी त्यास भारताच्या इतिहासात उल्लेखनीय स्थान मिळवून देणारी होती.

Scanned by CamScanner